RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यातील परस्पर संबंध : एक ऐतिहासिक अध्ययन

**डॉ. कैलाश फुलमाळी**
इतिहास विभाग प्रमुख
रेणुका कॉलेज बेसा–नागपुर
fulmali.kailash@gmail.com
7972985559

**सारांश : –**

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील संबंधाचा विचार करता हे संबंध केवळ सामाजिक चळवळीच्या पातळीवर अस्तित्वात होते असे नाही, तर ते वैयक्तिक जिव्हाळयाच्या पातळीवरही पोहोचलेले होते असे दिसून येते. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्यातील परस्परसंबंध व परस्पर दृष्टिकोनाचा शोध घेऊन निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**प्रस्तावना : –**

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट आणि त्यानंतर घडून आलेला परस्परांतील सहयोग ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अपूर्व घटना होती. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात शाहू– आंबेडकर कालखंडाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महापुरुषांच्या परिवर्तनवादी विचार व कृतींनी त्यांचा काळ हा बहुजनांच्या प्रबोधनाचा काळ मानला जातो. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर या दोन महापुरुषांच्या मध्ये वैयक्तिक व वैचारिक ऋणानुबंध निर्माण झाले होते. राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात डॉ. आंबेडकर यांचा उदय झाला. दोघांमध्ये भावनिक नाते होतेच. त्याशिवाय दलितांविषयीची कणव व सामाजिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय यासाठीचा संघर्ष हा समान धागा होता. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधाला अतिशय महत्त्व प्राप्त होते.

**शाहू – आंबेडकर पहिली भेट :-**

कोल्हापूर मध्ये शाहू महाराजांनी सुरू केलेल्या अस्पृश्यांच्या चळवळीत काही सुशिक्षित अस्पृश्य तरुण होते. दत्तोबा पोवार हे त्यापैकी एक होत. यांनी १९१७ मध्येच डॉ. आंबेडकरांशी आपला परिचय करून घेतला होता. याच दत्तोबा पोवार यांनी बाबासाहेबांविषयी सविस्तर माहिती शाहू महाराजांना सांगितली होती.[१] म्हणूनच शाहू महाराजांना डॉ. आंबेडकरांना भेटण्याची ओढ निर्माण झाली होती.

१९१९ मध्ये जेव्हा शाहू महाराज मुंबईला आले, तेव्हा बाबासाहेब परळीच्या चाळीत राहात होते. येथे स्वतः शाहू महाराज बाबासाहेबांना भेटण्याकरिता गेले. कोल्हापूरचे राजे आपल्याला भेटण्यासाठी आलेले आहे,[२] असा निरोप मिळताच व्दितीय मजल्यावर राहत असलेले बाबासाहेब खाली आले आणि महाराजांना भेटले. अशाप्रकारे शाहू–आंबेडकर पहिली भेट परळीच्या चाळीत घडून आली. बाबासाहेबांना पाहुन शाहू महाराजांना मोठा आनंद झाला. त्यांनी बाबासाहेबांना आपल्या सोबत पन्हाळ्या लाजवर नेले. तिथे दोघांची प्रदीर्घ चर्चा झाली. याच वेळी शाहू महाराजांनी बाबासाहेबांना कोल्हापूरला येण्याचे निमंत्रणही दिले. अशाप्रकारे पहिली भेट घडून आली.

**बाबासाहेबांची कोल्हापूरला भेट :-**

ठरल्याप्रमाणे बाबासाहेब जेव्हा कोल्हापूरला आले. तेव्हा शाहू महाराजांनी बाबासाहेबांची कोल्हापूर शहरात मिरवणूक काढली होती. त्यांचे स्वागत राजेशाही थाटात केले होते. तसेच सोनतळी कॅम्पवर त्यांच्या समवेत भोजनही केले होते. याच भेटीत महाराजांनी अनेक विषयांवर बाबासाहेबांची बाबासाहेबांशी प्रदीर्घ चर्चाही केली होती. यावेळी महाराजांनी निरोप समारंभ आयोजित केला आणि बाबासाहेबांना जरीपटकाचा आहेर करून त्यांचा जाहीर सत्कार केला. यावेळी बाबासाहेब म्हणाले की, 'छत्रपतींनी दिलेला मानाचा जरीपटका माझ्या मस्तकी चढविला आहे, त्याचा मी सदैव मान राखीन'.[३]

**मूकनायक पाक्षिकास सहाय्य :-**

अस्पृश्यांची बाजू जनतेसमोर आणि भारत दौऱ्यावर असलेल्या साउथबरो समितीसमोर मांडण्यासाठी बाबासाहेबांना वर्तमान पत्राची आवश्यकता होती. तेव्हा बाबासाहेबांच्या प्रेरणेने काही अस्पृश्य समाज सेवकांनी शाहू महाराज मुंबईला आल्यावर त्यांची भेट घेतली व वर्तमान पत्राची योजना त्यांच्यासमोर ठेवली. राजश्री शाहू महाराजांनी तात्काळ वर्तमान पत्र काढण्यासाठी अडीच हजारांचा चेक दिला. महाराजांनी दिलेल्या या पैशातूनच मूकनायक या पाक्षिकाचा जन्म झाला. मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० मध्ये प्रसिद्ध झाला. पाक्षिकाचे संपादक म्हणून पांडुरंग नंदराम भटकर यांची नियुक्ती केली होती. मूकनायक पाक्षिकातील पहिले तेरा अग्रलेख स्वतः बाबासाहेबांनी लिहीले होते.[४]

**माणगाव परिषद :-**

२० व २१ मार्च १९२० मध्ये दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन माणगाव येथे आयोजित करण्यात आले. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेबांची निवड करण्यात आली. या परिषदेला राजर्षी शाहू महाराज सुद्धा उपस्थित असल्यामुळे ही एक ऐतिहासिक घटना होती. या परिषदेमध्ये भाषण करताना शाहू महाराज म्हणतात की, 'आज माझे प्रिय मित्र आंबेडकर यांनी या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले आहे. त्यांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून मी येथे आलेलो आहे. मिस्टर आंबेडकर हे मूकनायक पत्र काढतात व सर्व मागासलेल्या जातींचा परामर्श घेतात त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. तसेच आज त्यांना पंडित ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे, विद्वानात ते एक भूषणच आहेत. आर्य समाज, बौद्ध समाज व ख्रिस्ती समाज यांनी त्यांना आपल्यामध्ये आनंदाने घेतले असते. परंतु ते तुमच्याकरीता तिकडे गेले नाहीत. याबद्दल तुम्ही त्यांचे आभार मानले पाहिजे व मीही मानतो'.[५]

या माणगाव परिषदेमध्ये बाबासाहेबांच्या पुढाकाराने परिषदेणे शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य आरंभिलेल्या बद्दल अभिनंदन करून, त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. असा खास ठराव मंजूर करण्यात आला.

**नागपूर परिषद :-**

अखिल भारतीय बहिष्कृत समाजाची पहिली परिषद नागपूर येथे दिनांक ३० व ३१ मे आणि ०१ जून १९२० ला तीन दिवस राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या परिषदेच्या मंचावर शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दत्तोपंत दळवी, सिताराम जानबा कांबळे, बाबू कालीचरण आणि ग. आ. गवई इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी भाषण करताना शाहू महाराज म्हणाले की, 'आपण मला आज 'आपला' म्हटले आहे. त्याप्रमाणे शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा. मी देखील कितीही अडचणी आल्या कितीही त्रास झाला तरी त्याला न जुमानता आपल्या उन्नतीच्या महत्कार्यास शक्य तेवढा हातभार लावण्यास कधीही माघार घेणार नाही.'[६]

**परस्पर पत्रव्यवहार :-**

- १३ जून १९२० मध्ये डॉ. आंबेडकरांनी छत्रपती शाहू महाराज यांना पत्र लिहिले. यामध्ये त्यांनी माणगाव व नागपूरच्या सभेत पास झालेल्या ठरावानुसार २६ जून हा दिवस आपला वाढदिवस म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. तसेच त्याच दिवशी 'मूकनायक' या पाक्षिकाचा विशेष अंक काढण्याचे नियोजित झाले आहे. यामध्ये महाराजांचा फोटो व त्यांच्या कार्याची उज्वल रूपरेखा देण्यात येणार आहे. याकरिता माहिती गोळा करण्यासाठी मी स्वतः कोल्हापूरला येत आहे. मंगळवारी संध्याकाळी पोहोचेन. हूजुरांच्या दर्शनाचा लाभ होईलच. असे पत्र डॉ. आंबेडकरांनी शाहू महाराजांना लिहिलेले आहे.
- शाहू महाराजांनी दिनांक २३ जून १९२० रोजी आपले मित्र अल्फ्रेड पीज यांना पत्र लिहिले. यामध्ये त्यांनी डॉ. आंबेडकर हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला येत आहे. तेव्हा आपण डॉ. आंबेडकरांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे आणि त्यांना आपल्या परीने शक्य होईल तेवढी मदत करावी.[७] असे महाराजांनी लिहिलेले आहे.
- डॉ. आंबेडकरांनी दिनांक २८ जून १९२० ला इंग्लंडवरून शाहू महाराजांना पत्र लिहिले. यामध्ये त्यांनी लोकमान्य टिळकांनी 'महार ही गुन्हेगार जमात आहे' असे उदगार काढल्यामुळे त्यांच्याविरुद्ध खटला दाखल करता येईल का अशी विचारणा डॉ. आंबेडकरांनी केली होती.
- शाहू महाराजांनी दिनांक ८ जुलै १९२० ला डॉ. आंबेडकर यांना पत्र लिहिले. यामध्ये ते लिहितात की, लोकमान्य टिळकांच्या विरुद्धच्या खटल्याच्या निमित्ताने तुमचे नाव संपूर्ण इंग्लंडभर होईल आणि इंग्लंडमधील प्रत्येक जण तुमची चर्चा करेल.[८]
- दिनांक १४ डिसेंबर १९२० ला शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकर यांना इंग्लंडमध्ये पत्र पाठवले होते. यामध्ये त्यांनी डॉ. आंबेडकरांना इंग्लंड मधील लोकांना, भारतीय अस्पृश्यांची परिस्थिती समजावून सांगण्याकरिता तसेच येतील परिस्थितीशी सामना करण्याकरिता प्रोत्साहन दिलेले होते.
- डॉ. आंबेडकरांनी दिनांक ३ फेब्रुवारी १९२१ ला इंग्लंड वरून शाहू महाराजांना पत्र लिहिले. त्यामध्ये त्यांनी लिहिले की, मिस्टर माँटेग्यूनी मला मुंबई कायदेमंडळाचा सदस्य म्हणून हिंदुस्तानात परत जावे असा आग्रह केला. परंतु मी माझा अभ्यास अर्धवट टाकून येऊ इच्छित नाही.[९] अशी महाराजांना माहिती दिली.
- डॉ. आंबेडकरांनी दिनांक १४ सप्टेंबर १९२१ ला शाहू महाराजांना पत्र लिहिलेले आहे. यामध्ये त्यांनी आर्थिक अडचणी विषयी लिहिलेले असून त्याकरिता 200 पौंडाची रक्कम पाठविण्याची विनंती केली आहे. याच पत्राच्या शेवटी बाबासाहेबांनी शुभेच्छा देतांना, महाराजांचा भारतातील सामाजिक लोकशाही चळवळीचे आधारस्तंभ म्हणून गौरव केलेला आहे.[१०]
- डॉ. आंबेडकरांनी दिनांक १० मे १९२२ ला लंडनहून नूतन छत्रपती राजाराम महाराज यांना पत्र लिहिले. यामध्ये त्यांनी शाहू महाराजांच्या मृत्युने मी माझा एक वैयक्तिक स्नेही गमावले आहेत आणि दलित समाज त्यांच्या एका महान हितचिंतकांस व एका महान कैवारी यास मुकला आहे. मी माझ्या दुःखात असतानाच आपल्यावर व महाराणी साहेबांवर असलेल्या दुःखात अपार सहानुभूतीने सहभागी होत आहे,[११] असे लिहिले.

**दलित प्रज्ञा परिषद :-**

१९४० मध्ये कोल्हापूर येथे 'दलित प्रज्ञा परिषदेच्या' निमित्त्याने बाबासाहेब आंबेडकर आले असता, आपल्या भाषणात त्यांनी म्हटले होते, ''कोल्हापूर संबंधी एक गोष्ट अगदी निश्चित आहे व या गोष्टीबद्दल अस्पृश्यांना व मला कोल्हापूरचा अभिमान वाटतो. शाहू महाराजांनी कोल्हापूरातच खरी लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली, ही ती गोष्ट होय.''[१२]

**निष्कर्ष :-**

१. दत्तोबा पोवार यांनी बाबासाहेबांविषयी सविस्तर माहिती शाहू महाराजांना सर्वप्रथम सांगितली असे दिसून येते.

२. १९१९ मध्ये शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांची पहिली भेट मुंबई येथील परळीच्या चाळीत झाली.

३. शाहू महाराजांनी कोल्हापूर येथे बाबासाहेबांना जरीपटकाचा आहेर करून त्यांचा जाहीर सत्कार केला.

४. राजर्षी शाहू महाराजांनी 'मूकनायक' वर्तमान पत्र काढण्यासाठी अडीच हजार रूपयाचे सहाय्य केल्याचे दिसून येते.

५. राजर्षी शाहू महाराजांनी बाबासाहेबांना 'पंडित' ही पदवी माणगाव परिषदेमध्ये दिली. ती खरोखरच योग्य होती हे सिध्द होते.

६. माणगाव व नागपूर परिषदेकरीता राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या एकत्रित उपस्थितीमुळे, दोघांच्याही भाषणामुळे, अस्पृश्य लोकांचे मनोधैर्य उंचावले असे दिसून येते.

७. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.आंबेडकर यांच्यातील परस्पर पत्र व्यवहारावरून त्यांच्यात विश्वासाचे, मैत्रीचे, एकमेकांविषयी आदराचे व जिव्हाळयाचे संबंध होते असे दिसून येते.

८. तसेच दोघांमध्ये भावनिक नाते होते. त्यासोबतच दलितांविषयीची कणव व सामाजिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय यासाठीचा संघर्ष हा एकसमान धागा होता.

९. सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे शाहू महाराज एक आधारस्तंभ म्हणून डॉ. आंबेडकर यांनी त्यांचा गौरव केलेला आहे.

१०. महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे शाहू महाराज उद्धारकर्ते म्हणून प्रसिद्धीस आलेले होते. असे असले तरी, बाबासाहेबांशी वागण्यात, बोलण्यात, पत्रव्यवहारात, भाषणात कुठेही त्यांनी आपले हे मोठेपण प्रदर्शित केलेले नाही. आपल्या बरोबरीची किंबहुना आपल्यापेक्षा जास्त 'सुशिक्षित व अभिमानी' असे आपले मित्र म्हणून बाबासाहेबांचा गौरव शाहू महाराजांनी केलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१. साळुंखे पी, बी. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९८८, पृष्ठ क्र. ४९६

२. खैरमोडे चां. भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-२, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९१, पृष्ठ क्र.४८

३. साळुंखे पी. बी. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९८८, पृष्ठ क्र.४९८

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multi-Disciplinary E-Journal
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

४. खैरमोडे चां. भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-१ , श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९२ , पृष्ठ क्र .७६
५. ढावरे रमेश, माणगाव परिषद ६१ वा स्मृतिमहोत्सव विशेष अंक, १९८२
६. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९२, पृष्ठ क्र .४४२
७. सुरवाडे विजय गंगाराम, पत्रव्यवहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत प्रकाशन, कल्याण, १९८६ , पृष्ठ क्र .२०
८. कित्ता– पृष्ठ क्र .४६
९. कोल्हापूर पुरालेखागार, शाहू दप्तर, कागद क्र. R१२८११
१०. कोल्हापूर पुरालेखागार, शाहू दप्तर, कागद क्र. R१३४२०
११. पवार जयसिंगराव, राजर्षी शाहू छत्रपती: पत्रव्यवहार आणि कायदे, सुमेरू प्रकाशन, डोंबिवली (पूर्व), २००७ , पृष्ठ क्र .६७
१२. कांबळे अरूण, जनता पत्रातील लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९२ , पृष्ठ क्र .१४२